# मनरेगा : कोरोना काळात स्थलांतरीतांची नवसंजीवनी (विशेष संदर्भ:नागपूर जिल्हा)

**श्री. श्रीकांत गोपीचंद शेंडे,**संशोधक विद्यार्थी,राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर

..........................................................................................................................

**सारांश :**

कोविड–१९ च्या महामारीने समस्त जगासमोर अचानकपणे अनेक प्रश्नांची मालीका उभी केली आहे. महामारीमध्ये साधारणपणे नागरीकांचे मृत्यू होणे आणि त्यामुळे आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर येणे याबाबतच अलिकडेपर्यंत विचार व्हायचा आणि त्याच दृष्टिकोणातून बघीतल्या जायचे. HIV, सार्स, इबोला या महामारीने निर्माण केलेले प्रश्न आणि नोवेल कोविड–१९ या विषाणूने उद्भवलेली परिस्थिती यामध्ये मात्र महद अंतर आहे. जगाच्या पाठीवर २१४ देश आहे यामधील १४ राष्ट्र वगळता कोरोना विषाणूने सगळ्याच राष्ट्रांना स्वत:ला बंदिस्त करवून होण्याची एकप्रकारे सक्तीच केली अथवा पाळी आणली. टाळेबंदीचा थरारक अनुभव प्रथमत:च जगाने घेतला आणि त्यामुळे बलाढ्य राष्ट्रांसमवेतच मागास राष्ट्रांच्या अर्थव्यवस्था डबघाईस आल्या. आणीबाणी सदृश्य परिस्थिती निर्माण होतानाच अराजक उद्भवेल अशीही स्थिती निर्माण होऊ लागली. जागतिक अर्थव्यवस्था कोलमडल्यात, स्थलांतर मोठ्या प्रमाणात झाले. रोजगार हिरावल्या गेला, आरोग्याचे प्रश्न भयावह बनले आणि जगण्याकरिता स्वत:ला टाळेबंद करून जीवन जगण्याची नामुष्की आली. या परिस्थितीत उदरनिर्वाहाचा प्रश्न सर्वाधीक भयावह बनला. आर्थिक परिस्थिती सक्षम असूनही आवश्यक असणाऱ्या वस्तू बाजारातून उपलब्ध न होऊ शकल्याने अनेकांना कायमचा निरोपही घ्यावा लागला. उद्योगक्षेत्र ठप्प पडल्याने कुशल कामगारांचा रोजगार संपुष्ठात आला आणि दुसऱ्यांच्या आश्रयावर जगण्याची नामुष्कीपण ओढावल्या गेली. जगाच्या ज्ञात इतिहासात आतापर्यंत एखाद्या विषाणूनी अशाप्रकारची स्थिती आकारास आणली होती याबाबत पुरावा नाही. त्यामुळे अनपेक्षीतपणे आदळलेल्या परिस्थितीतून बाहेर पडण्याच्या दृष्टीने विचार करणे जगभरातल्या राष्ट्रांना अनिवार्य ठरले. पर्याय म्हणून जगातील जवळपास राष्ट्रांनी परिस्थिती सावरण्याकरिता पॅकेजची घोषणा केली. अमेरिकेने २१० लक्ष कोटी रूपये घोषीत केले तर भारताने आपल्या जीडीपीच्या १० टक्के म्हणजेच २० लक्ष कोटी रूपयांची तरतूद केली. भारतातील अवाढव्य लोकसंख्या, त्यांचे विविधांगी प्रश्न यावरील उत्तर म्हणून एवढ्या राशींची तरतूद करण्यात आली.

पॅकेज घोषित करून प्रश्न सुटणार नाहीत याची जाणीव जगातील सर्वच राष्ट्रांना होऊ लागली. त्यांच्याकडे भारतातील रोजगारांना सामावून घेणाऱ्या मनरेगासारख्या योजना नसल्याने विकसीत देशांना टाळेबंदी उठवत लोकांचा जीव धोक्यात घालून उद्योगांना पुन्हा चालना द्यावी लागली. भारताकरिता मनरेगा योजना संजीवनी ठरली याची दोन कारणे आहेत. एक म्हणजे अर्थव्यवस्थेला पूर्णत: उद्योगकेंद्री न ठेवता ग्रामीण विकासाच्या अनुषंगाने का होईना त्याला समांतर जरी नसली तरी साह्यकारी क्षेत्र म्हणून तिला सातत्याने सुरू ठेवण्यात आले. परिणामी उद्योगक्षेत्रांना टाळे लागल्यामुळे येणारा भार थोपवून धरता आला. दुसरे म्हणजे भारत सरकारच्या आकडेवारीनुसार आठ कोटी लोकांनी स्थलांतरण केले. हे सर्व स्थलांतरण शहरी भागातून ग्रामीण भागात झाले. या स्थलांतरितांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न अल्प कालावधीकरीता का असेना तो मात्र मनरेगामुळे पूर्ण होऊ शकला. परिणामी भारत सरकारवर आलेला बेरोजगारीचा दाब हा बहुअंशी प्रमाणात कमी झाला. कोविड–१९ काळात भारतातील मनरेगा योजनेची स्थिती तत्पूर्वी असणारी स्थिती आणि नागपूर जिल्ह्याची स्थिती अभ्यासली असता मनरेगा योजना केवळ स्थलांतरीतांच्या जीवनाचे आशास्थान एवढेच मर्यादित राहिले नाही तर कोरोनासारख्या महामारीच्या प्रश्नांना प्रभावी उत्तर देण्याची क्षमता मनरेगा योजनेत आहे हे सिद्ध झाले. मनरेगा योजना, त्यातील भ्रष्टाचार, तिची अनुपयुक्तता यावर ज्या संमिश्र प्रतिक्रिया मध्यंतरीच्या कालखंडात उमटल्या होत्या त्याची जागा भारतातील समस्त नागरिकांना रोजगार पुरविणारी, नागरी हितांचे संरक्षण करणारी आणि जगण्याची उमेद जिवंत राखणारी आहे अशा प्रतिक्रियांमध्ये परावर्तीत झाली आहे हे या योजनेचे यश असण्यासोबतच ग्रामीण क्षेत्राच्या समावेशीकरणासोबतच ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालणा देत भारताच्या आत्मनिर्भरतेचे बळ

जागविणारी एक कृतिशील योजना होय. हे कोरोना काळात भारतात घडलेल्या प्रश्नातून उजागर झालेले उत्तर होय.

***मुळ शब्द** :कोविड–१९, स्थलांतरण, मनरेगा योजना, उदरनिर्वाहाचा प्रश्न, आत्मनिर्भर भारत.

**विषय प्रवेश :**

कोविड–१९ नावाच्या महाभयंकर वैश्विक महामारीमुळे आज संपूर्ण जग होरपळून निघालेले आहे. या विषाणुने फक्त लहाणग्या देशांनाच नव्हे तर जगातील बलाढ्य व आरोग्य सुविधांच्या बाबतीत अव्वल क्रमांकावर असणाऱ्या राष्ट्रांनाही 'सळो की पळो' करून सोडलेला आहे. संपूर्ण जगामध्ये स्वत:ला महासत्ता बनविण्याची स्पर्धा सुरू असताना या विषाणूची अनपेक्षित एंट्री झाली आणि संपूर्ण जगाचेच चित्र आज बदललेले आपणास दिसते आहे. आज संपूर्ण जगासमोर माणूस जगविण्याचा यक्ष प्रश्न उपस्थित झालेला आहे. जागतिक आरोग्य संघटनाही अजून या विषाणूवर जोडगा शोधण्यात यशस्वी झोलेली नाही. जगातील प्रत्येक राष्ट्रे आज या विषाणूवरील औषध शोधण्यासाठी दिवस–रात्र एक करत आहेत परंतु अद्याप असे औषध तयार झालेले नाही यावरूनच कोविड–१९ ची भयावहता आपल्या लक्षात येते. कोविड–१९ मुळे दररोज होणारे मृत्यू, सततची टाळेबंदी यामुळे दुसरा महत्त्वपूर्ण प्रश्नही जगासमोर येऊन ठाकला आहे तो म्हणजे आपापल्या देशाची अर्थव्यवस्था सावरण्याची. कोविड–१९ मुळे जगातील जवळपास संपूर्ण देशांनीच कमी–अधिक प्रमाणात निर्बंध लावून टाळेबंदीची घोषणा केलेली आहे. ज्यामुळे सर्वात मोठा फटका हा औद्योगिक क्षेत्रामध्ये बसलेला दिसून येतो आणि याच क्षेत्रामध्ये काम करणारा औद्योगिक कामगार वर्ग आज बेरोजगारीच्या खायीत जाताना दिसतोय आणि या वर्गाला स्वत:चे आणि आपल्या कुटुंबीयांचे भरण–पोषण करण्यासाठी पर्यायी व्यवस्थेची गरज आहे.

जागतिक महासत्ता असणाऱ्या अमेरिकेलाही कोविड–१९ चा फटका अभुतपूर्ण बसला. १.५ कोटी लोकांनी मागील पाच महिण्यात आपला स्थिर रोजगार गमावला आहे तर १० कोटी नागरिकांनी बेरोजगारी भत्त्याकरिता अमेरीकन सरकारकडे नोंदनी केली. अमेरीकन सरकारव्दारा जारी केलेली ही आकडेवारी लक्षात घेतली तर कोविड–१९ ने किती जबरदस्त धक्का अर्थव्यवस्थेसोबतच नागरिकांच्या जिवित व्यवस्थेला दिला हे लक्षात येते.

भारतातही या महामारीपासून सुटलेले नाही. २२ मार्च २०२० ला १४ तासांच्या जनता कर्फ्यूपासून झालेली सुरूवात पुढे जवळपास ७० दिवसांच्या कडक टाळेबंदीमध्ये परिवर्तीत झाली आणि या काळात भारतासमोरही एकीकडे कोविड–१९ चे संकट तर दुसरीकडे लोकांवर आलेली उपासमारीची वेळ, बेरोजगारीचा प्रश्न या समस्या प्रामुख्याने उभ्या राहिल्यात. तसेही "Unemployment and poverty are considered as blood brothers" [१] असे म्हटल्या गेले आहे. बेरोजगारी आणि दारिद्र्याच्या खायीतून भारताला काहीश्या प्रमाणात का होईना सावरण्याचे काम महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा – २००५ (मनरेगा) ने केलेले आहे असे आजवर झालेल्या विविध सर्वेक्षणावरून लक्षात येते. फक्त ''एप्रिल (२०२०) महिन्यामध्ये देशभरात १२.२ कोटी लोक बेकार झाले आहेत असे सेंटर फॉर मॉनिटरिंग इंडियन इकॉनॉमी या संघटनेने म्हटले आहे''. कोरोनामुळे बेरोजगारीच्या विळख्यात अडकलेल्या नागरिकांना सावरण्यात मनरेगा बजावत असलेल्या भूमिकेचे विश्लेषण प्रस्तुत संशोधन लेखात करण्यात आले आहे.

**भारतातील टाळेबंदीचे टप्पे :**

जगातील दुसऱ्या देशांनी कोरोनापासून बचावासाठी टाळेबंदीचा मार्ग स्वीकारला आणि याच धर्तीवर भारतानेही २२ मार्च २०२० रोजी सर्वप्रथम चौदा तासांचा स्वयंस्फूर्त जनता कर्फ्यू घोषित केला. तद्नंतर भारत सरकार तर्फे दि. २४ मार्च २०२० रोजी अधिसुचना काढून संपूर्ण भारतामध्ये पुढील एकेवीस दिवसासाठी संपूर्ण टाळेबंदी करण्यात आली. हा भारतात टाळेबंदीचा पहिला टप्पा होता. यावेळी भारतात कोरोना संक्रमितांची संख्या जवळपास ५०० इतकीच होती. कोरोना संक्रमणाची साखळी तोडण्यासाठी केंद्र सरकारतर्फे घेतलेला हा खुप मोठा निर्णय होता.

टाळेबंदीचा पहिला टप्पा आटोपता—आटोपता कोरोना संक्रमितांची संख्या कमी होण्याऐवजी वाढतच गेली आणि नाईलाजाने शासनाला टाळेबंदीचा दुसरा टप्पा सुरू करावा लागला. दुसरा टप्पा हा एकोणविस दिवसाचा म्हणजेच १५ एप्रिल २०२० ते ३ मे २०२० असा होता. त्यानंतर तिसरा ४ मे २०२० ते १७ मे २०२० असा एकूण चौदा दिवस तर चौथा आणि शेवटचा टप्पा सुद्धा चौदा दिवसांचा १८ ते २०२० ते ३१ मे २०२० होता. अशाप्रकारे जवळपास सत्तर दिवस भारतामध्ये टाळेबंदी करण्यात आली होती.

टाळेबंदीची घोषणा करताना गृह मंत्रालयाव्दारे अधिसुचना निर्गमित करण्यात आली ज्यात नागरिकांसाठी काही निर्बंध टाकण्यात आलेत परंतु शासनाने वारंवार केलेल्या सूचना व सक्तीला न जुमानल्यामुळे नागरिकांनी कोरोना विषाणूला पसरण्याची संधी दिली आणि आज एकूण संक्रमितांच्या संख्येच्या बाबतीत भारत जगात तिसऱ्या क्रमांकावर आलेला आहे. केंद्र सरकारव्दारे जारी करण्यात आलेत मात्र आर्थिकतेच्या आघाडीवर नव्याने प्रारंभ करतांना नव्या प्रश्नांसोबतच टाळेबंदीच्या काळात लघुउद्योग, औद्योगिक क्षेत्र, असंघटीत क्षेत्रातील कार्य थांबल्यामुळे बेरोजगाराचे प्रमाण लक्षणीय वाढले. विशेषत: दुसऱ्या टप्प्यापासूनच टाळेबंदी झुगारून देऊन शहरातून स्थलांतरीतांच मोठे लोंढे आपल्या मूळ गावी परतायला सुरूवात झाली. स्थलांतरनाचा प्रश्न केवळ आरोग्यापर्यंतच मर्यादित न राहता त्याची व्यापकता रोजगार पर्यायाने उदरनिर्वाहाशी निगडीत बनला. त्याचे पडसाद आर्थिकतेसोबतच सामाजिक क्षेत्रावर मोठ्या प्रमाणात पडले. उद्भवलेल्या समस्यांचा विचार करता त्याची तीव्रता जागवणारी आहे.

**टाळेबंदीमुळे उद्‌भवलेल्या समस्या :**

संपूर्ण देश एकिकडे कोरोनाशी लढा देण्यात व्यस्त असताना दुसरीकडे मात्र भारत वेगळ्याच समस्यांना सामोरे जात होता.

१) औद्योगिक आस्थापणे, खाजगी कार्यालये, उद्योग, सर्व प्रकारची कामे बंद पडल्यामुळे बेरोजगारीचा मोठा प्रश्न निर्माण झाला.

२) शहरात वास्तव्याला असणारा कामगार वर्ग मोठ्या प्रमाणात आपल्या स्वगृही परतण्यास सुरूवात झाली. कोरोना काळात स्थलांतराचे प्रमाण खूप जास्त असल्याचे निदर्शनास आले.

३) रोजगार गेल्यामुळे दारिद्र्याची समस्या मोठ्या प्रमाणात जाणवू लागली.

४) आर्थिक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. सोबतच आरोग्याचे प्रश्न गंभीर बनलेत.

कोरोनामुळे जणू जगावरच एकप्रकारचे आर्थिक संकट ओढावले आहे. भारताने या कोरोना काळात ज्या समस्यांना तोंड दिले त्यात बेरोजगारी व स्थलांतरण हे प्रश्न प्रामुख्याने होते. शहरी भागात रोजगाराच्या शोधात आलेल्या आणि वास्तव्यास असलेल्या लोकांची संख्या भारतामध्ये खूप मोठी आहे. अशा ''प्रत्येक व्यक्ती आपल्या ईच्छा अपेक्षा पूर्ण करण्यासाठी पूर्ण कौशल्याने प्रयत्न करतो पण ज्यावेळी या अपेक्षा पूर्ण होत नाहीत त्यावेळी ती व्यक्ती स्वत:ला गरिब किंवा दारिद्री समजते.''[२] अर्थातच या लोकांवर ओढावलेली ''दारिद्र्याची समस्या निर्माण होण्याचे मुख्य कारण म्हणजे बेरोजगारी होय.''[३] शहरात वास्तव्यास असणारे नागरिक जेव्हा आपल्या स्वगृही स्थलांतरण करायला लागले त्यावेळी शहरात रिकामे बसून भुकेने मरण्यापेक्षा गावात जाऊन स्वत:ची उपजीविका करण्याचा विश्वास असल्याचे मत अनेक स्थलांतरित मजुरांनी व्यक्त केले. याचे सर्वात मोठे कारण म्हणजे ग्रामीण क्षेत्राच्या विकासासाठी २००५ मध्ये केंद्र शासनाने लागु केलेल्या 'महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम — २००५' हे होय.

**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा २००५ :**

**योजनेचा परिचय :**

''स्वातंत्र्योत्तर काळात भारताचा आर्थिक विकास अनेक क्षेत्रामध्ये होत असुनही ग्रामीण भागातील दारिद्र्यरेषेखालील लोकांचे प्रमाण कमी झाले नसून आजही ग्रामीण भागातील लोकांची राहणीमानाची पातळी अतिशय निम्न दर्जाची आहे. उलटपक्षी नागरी आणि ग्रामीण लोकांच्या जीवनातील तफावत वाढली आहे''.[४] याची प्रचिती भारतात राबविल्या गेलेल्या पंचवार्षिक योजनांमधून आपल्याला येतेच. महात्मा गांधींनी म्हटल्याप्रमाणे 'भारताचे खरे दर्शन

खेड्यातच होते आणि ग्राम हाच भारताचा आत्मा होय' हा विचार लक्षात घेऊनच केंद्रसरकार तसेच राज्य सरकारांकडून ग्रामीण विकासावर विशेष लक्ष केंद्रीत करण्यात आलेले आहे. २०११ च्या जनगणनेनुसार भारतातील ६८.८४% जनता ही ग्रामीण भागात वास्तव्यास आहे त्यामुळे ग्रामीण क्षेत्राचा विकास झाल्याशिवाय देशाचा विकास होऊ शकत नाही ही गोष्ट तर सुर्यप्रकाशाईतकी स्पष्ट आहे. याच विचाराचे प्रतिक म्हणजे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा — २००५ (मनरेगा) होय. ''ग्रामीण कुटुंबांना गरीबी आणि भूकेपासून वाचविणे''[५] हा मुख्य उद्देश्य डोळ्यासमोर ठेवून मनरेगा कायद्याची निर्मिती करण्यात आलेली आहे. मनरेगा कायदा ५ सप्टेंबर २००५ ला अंमलात आला व तीन टप्प्यात या कायद्याला संपूर्ण भारतभर लागू करण्यात आले. ''पहिला टप्पा २ फेब्रुवारी २००६ पासून सुरू झाला व या टप्प्यामध्ये देशातील एकूण २०० जिल्ह्यात मनरेगाची अंमलबजावणी सुरू झाली. मार्च २००८ पासून सुरू झालेल्या दुसऱ्या टप्प्यात एकूण १३० जिल्हे तर २९५ जिल्ह्यात १ एप्रिल २००८ पासून म्हणजेच तिसऱ्या टप्प्यात या कायद्याची अंमलबजावणी सुरू झाली.''[६]

''मागेल त्याला काम या तत्वावर आधारलेला या योजनेत नोंदणीकृत कुटुंबातील वित्तीय वर्षात किमान १०० दिवस (केंद्रीय निधीतून) अकुशल रोजगाराची हमी दिली जाते''.[७] केंद्र सरकार तसेच राज्य सरकारव्दारा आजपर्यंत रोजगार निर्मिती व दारिद्र्य निर्मुलनासाठी अनेक कार्यक्रम आणि योजना राबविल्या गेल्यात परंतु ''मजुरांना कामाची मागणी करण्याचा आणि मागितल्यानंतर काम मिळण्याचा कायदेशीर हक्क हे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायद्याचे सर्वात महत्वाचे वैशिष्ट्य आणि वेगळेपणही आहे. या आधी राबवल्या गेलेल्या इतर कोणत्याही रोजगार कार्यक्रमात अशी तरतूद नव्हती.''[८] सध्या संपूर्ण जग कोविड—१९ सारख्या महामारीशी लढत असताना सर्वात मोठा फटका हा रोजगाराच्या क्षेत्रात बसलेला दिसतो. भारतही त्यातून सुटलेला नाही परंतु भारतामध्ये उद्‌भवलेले रोजगाराचे संकट काही अंशी मनरेगा योजनेव्दारा कमी करण्याचे काम झाल्याचे निदर्शनास येते. केंद्राच्या २०२०—२१ च्या आर्थिक बजेटमध्ये मनरेगासाठी ६१,००० कोटींची तरतुद आली होती परंतु कोरोना संकटामुळे उद्‌भवलेल्या परिस्थितीमुळे स्वावलंबी भारताचा निर्धार करताना जेव्हा मा. पंतप्रधान नरेंद्र मोदींव्दारे २० लाख कोटींचे आर्थिक पॅकेज घोषित करण्यात आले त्यात मनरेगासाठी अतिरिक्त ४०,००० कोटींची तरतुद करण्यात आली. यावरून स्थलांतरीत झालेल्या मजुरांना त्यांच्या गावात रोजगार उपलब्ध करून देण्यास केंद्र सरकार कटिबद्ध असल्याचे दिसून येते.

| वर्ष | केंद्रीय बजेट मध्ये मनरेगासाठी तरतुद (कोटीमध्ये) |
|---|---|
| २०१५—१६ | ३३,७०० |
| २०१६—१७ | ३८,००० |
| २०१७—१८ | ४८,००० |
| २०१८—१९ | ५५,००० |
| २०१९—२० | ६०,००० |
| २०२०—२१ | ६१,००० |

स्त्रोत : http://indiabudget.nic.in

**नागपूर जिल्ह्यात मनरेगा :**

देशव्यापी टाळेबंदीमुळे सबंध भारतभर स्थलांतरणाचे सत्र सुरू झाले. नागपूर जिल्ह्यानेही याचा अनुभव घेतला. ''भारत देशाच्या हृदयस्थानी वसलेले एक महत्त्वाचे सर्वांग सुंदर, गौरव संपन्न आणि अनेक ऐतिहासिक गुण व महत्त्व लाभलेले शहर म्हणजे नागपूर''[९] अशी ओळख असलेल्या नागपूर शहरात रोजगाराच्या उपलब्ध असलेल्या मोठमोठ्या संधी बघून नागपूरच्या ग्रामीण भागातूनच नव्हे तर संपूर्ण भारतातून मजूर मोठ्या संख्येने नागपूर शहरात वास्तव्यास आले होते. शहराकडे स्थलांतरण करणारे बहुसंख्य मजुर हे अल्पभूधारक किंवा ज्यांच्याकडे गावातही मजुरीशिवाय दुसरा पर्याय नाही असे आहेत. अश्यावेळी कोविड—१९ सारख्या वैश्विक महामारिने जेव्हा शहरी भागातही या मजुरांपूढे रोजगाराचा प्रश्न उद्‌भवला व जीवन जगण्यासाठीही संघर्ष करावा लागला तेव्हामात्र ग्रामीण भागातून रोजगाराच्या

शोधात आलेल्या या वर्गाने स्वगृही परतण्याचा निर्णय घेतला. याचे सगळ्यात मोठे कारण म्हणजे देशात सुरू असलेल्या टाळेबंदीची अनिश्चितता यातुनच टाळेबंदीच्या काळात वाहतुकीची साधने नसतानासुद्धा मजुर मोठ्या संख्सेने शेकडो किलोमिटर आपापल्या गावाकडे पायपीट करीत स्थलांतरित होत असल्याचे हृदयविदारक चित्र या काळात अनुभवाला मिळालेत.

गावात परतल्यानंतर उपजिविकेचे साधन म्हणून या मजुरांनी मनरेगाकडे बघितले हे विशेष. याचे प्रमुख कारण म्हणजे स्थलांतरित झालेले बहुसंख्य मजुर हे अल्पभूधारक किंवा ज्यांच्याकडे मजुरीशिवाय दुसरा पर्याय नाही असे आहेत. त्यामुळेच या आर्थिक वर्षात फक्त चार महिने लोटले आहेत परंतु मागील दोन वर्षाची तुलना केल्यास मनरेगाअंतर्गत आतापर्यंत झालेल्या रोजगाराच्या मागणीचे प्रमाण हे जास्त दिसून येते.

**नागपूर जिल्ह्यात मनरेगाअंतर्गत कामाची मागणी व पुरविलेला रोजगार :**

| वर्ष | कामाची मागणी केलेल्या व्यक्तींची संख्या | रोजगार देऊ केलेल्या व्यक्तींची संख्या | प्रत्यक्ष कामावर हजर व्यक्तींची संख्या | रोजगार उपलब्ध करून दिल्याचे प्रमाण |
|---|---|---|---|---|
| २०१८—१९ | ६६,८०० | ६६,७६७ | ६१,७३२ | ९९.९५% |
| २०१९—२० | ६०,८१० | ६०,७६१ | ५६,७९३ | ९९.९२% |
| १ एप्रिल २०२० ते ४ ऑगस्ट २०२० | ४०,९१९ | ४०,८६५ | ३६,२९० | ९९.८७% |

स्त्रोत : www.nrega.nic.in

''रोजगार उपलब्ध न झाल्यामुळे लोकांचे आर्थिक व सामाजिक संतुलन बिघडते. त्यांच्यासमोर अनेक प्रकारच्या समस्या निर्माण होतात. या समस्या देशाची प्रगती, एकता, अखंडता व स्थीरता यासाठी प्रतिकूल परिस्थिती निर्माण करतात''[१०] परंतु ग्रामीण जनतेला रोजगारक्षम बनविण्याच्या दृष्टीने मागेल त्याला काम या तत्त्वावर सुरू झालेली मनरेगा योजनेची फलश्रृती वरील तक्त्यावरून सिद्ध होते. सन २०१८—१९ मध्ये एकूण ९९.९५% लोकांना रोजगार उपलब्ध केलेला आहे. तर २०१९—२० मध्ये रोजगाराची मागणी केलेल्या एकूण ६०,८१० व्यक्तींपैकी एकूण ६०,७६१ व्यक्तींना मनरेगाअंतर्गत रोजगार उपलब्ध करून दिलेला आहे. हे प्रमाण ९९.९२% इतके आहे. सन २०१८—१९ व २०१९—२० या दोन वर्षातील कामाची मागणी केलेल्या व्यक्तींची संख्या लक्षात घेता ही संख्या अनुक्रमे ६६,८०० व ६०,८१० इतकी आहे. ही संख्या एका आर्थिक वर्षात नागपूर जिल्ह्यामधील कामाची मागणी करणाऱ्या व्यक्तींची एकूण संख्या आहे. परंतु चालू आर्थिक वर्ष २०२०—२१ चा विचार करता शासनाव्दारे देशव्यापी टाळेबंदी सुरू झाल्यापासून चार महिन्याचा कालावधी लोटल्यानंतरची आहे. या चार महिन्यामध्येच नागपूर जिल्ह्यामध्ये एकूण ४०,९१९ लोकांनी मनरेगाअंतर्गत कामाची मागणी केल्याचे दिसून येते. या ४०,९१९ व्यक्तींपैकी ४०,८६५ व्यक्तींना शासनामार्फत रोजगार उपलब्ध करून दिलेला आहे. हे प्रमाण ९९.८७% इतके आहे. एकंदरीत मागील दोन वर्ष व टाळेबंदीच्या काळातील चार महिने याचा तुलनात्मक अभ्यास केल्यास, कामाच्या मागणीचे वाढलेले प्रमाण हे सिद्ध करते की कोरोना काळात ग्रामीण क्षेत्रात स्थलांतरण करून आलेल्या लोकांसाठी मनरेगा योजना ही संजीवनी म्हणून समोर आलेली आहे व ''जगातील सर्वात मोठी रोजगार देणारी योजना ठरली आहे.''[११]

**नागपूर जिल्ह्यातील मनरेगावर झालेला खर्च :**

मनरेगा योजनेच्या माध्यमातून ''ग्रामीण भागातील शेतकरी / शेतमजुर यांना रोजगाराचा हक्क प्रदान करणे, सामाजिक सुरक्षा देणे, महिला व दुर्बल घटकांचे सबलीकरण करणे तसेच पंचायत राज संस्थांचे बळकटीकरण करण्यावर भर देण्यात आलो.''[१२] यासाठी केंद्र सरकारव्दारे पुरेपुर प्रयत्न केल्या जातो. केंद्राच्या आर्थिक बजेटमध्ये दरवर्षी मनरेगासाठी विशेष तरतूद करण्यात येते. केंद्र सरकारच्या अनुदानाव्यतिरिक्त मनरेगावर राज्यसरकारव्दाराही खर्चाचे प्रावधान आहे. कायद्यातील तरतूदीनुसार राज्य सरकार ही योजना वर्षभरही राबवू शकते. ज्यातील १०० दिवसाच्या रोजगारावर होणारा खर्च हा केंद्राव्दारे तर त्यापेक्षा अधिक दिवसासाठी झालेला खर्च हा राज्यसरकारव्दारे निर्गमित केल्या जातो.

| वर्ष | झालेला खर्च (लाखात) |
|---|---|
| २०१८—१९ | ५,६०५.१७ |
| २०१९—२० | ४,७५२.७९ |
| १ एप्रिल २०२० ते ४ ऑगस्ट २०२० | २,०७०.०२ |

स्त्रोत : www.nrega.nic.in

भारतामध्ये 'दारिद्र्याची मुख्य समस्या निर्माण होण्याचे मुख्य कारण म्हणजे बेरोजगारी होय' हे जाणूनच संविधान निर्मात्यांनी भारतीय राज्यघटनेच्या ''कलम ४१ मध्ये व्यक्तिला कामाचा हक्क प्रदान''[१३] केला आहे. या हक्काला सक्षमरीत्या प्रस्तुत करणारी योजना म्हणून मनरेगाकडे बघण्यात येते. नागपूर जिल्ह्यात मनरेगावर झालेल्या एकूण खर्चाचा विचार केल्यास २०१८—१९ मध्ये एकूण ५,६०५.१७ लक्ष तर २०१९—२० मध्ये हा खर्च ४,७५२.७९ लक्ष इतका करण्यात आला. परंतु मागील चार महिन्यांची स्थिती बघता या चार महिन्यातच मनरेगाअंतर्गत झालेला एकूण खर्च हा २,०७०.०२ लक्ष इतका म्हणजे मागील दोन वर्षाची एकूण खर्चाच्या तुलनेत ५०% अधिक दिसून येतो. यावरूनच कोरोना संकटाच्या काळात मनरेगा अंतर्गत झालेली कामाची मागणी आणि त्यावर झालेला एकूण खर्च हा ग्रामीण भागाला अधिक सक्षम बनविण्याच्या दृष्टीने उचललेले पाऊल अधिक भक्कम बनविणारा असल्याचे दिसते. या चार महिण्याच्या कालावधीत ''नागपूर जिल्ह्यात एकूण ७,९७,७०२ इतकी मनुष्य दिवस निर्मिती झाली आहे''. अर्थातच यामुळे ग्रामीण क्षेत्रही आता रोजगाराभीमुख झाले असल्याचे स्पष्ट होते.

**मुल्यांकन :**

औद्योगिक क्रांतीमुळे देशाच्या आर्थिक विकासाचा केंद्रबिंदू ग्रामीण क्षेत्राकडून म्हणजेच कृषि क्षेत्राकडून उद्योगांच्या क्षेत्राकडे वळला. याचे प्रतिबिंब भारतातच्या तिसऱ्या पंचवार्षिक योजनेत तर अलिकडच्या नीती आयोगात पडलेले दिसून येते. ग्रामीण विकासाच्या दृष्टीने शासनाने करावयाचा खर्च आणि उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या संधी १९६० नंतर अत्यंत कमी प्रमाणात व्हायला लागले. परिणामी ग्रामीण भागातील रोजगारक्षम संख्या रोजगार प्राप्तीकरीता नागरिक क्षेत्राकडे अथवा उद्योग क्षेत्राकडे वळू लागली. गेल्या अनेक वर्षामध्ये उद्योग क्षेत्राने बजावलेल्या कामगिरीमुळे देशाची अर्थव्यवस्था सावरून धरण्यात ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या तुलनेत उद्योग अर्थव्यवस्था यशस्वी ठरली हे वास्तव आहे. या वास्तववादी रचनेला धक्का मात्र कोरोनामुळे उद्भवलेल्या महामारीच्या साथीने दिला आहे. परिणामी जवळपास सहा दशके देशाच्या अर्थव्यवस्था उद्योगक्षेत्र सावरून धरत असतात या विधानाला तडा बसला आणि नागरिक शहराच्या तुलनेत ग्रामीण क्षेत्रात अधिक सुरक्षित आणि आवश्यक गरजांमध्ये जगू शकतात या नव्या नियमनांचे आविष्करण झाले.

कोविड काळातील मनरेगा योजनेचे यश एकूणच निकषांच्या फुटपट्टीवर मोजावयाचे झाल्यास ग्रामीण विकासातून देशातील रोजगारक्षम लोकांना सामावून घेता येऊ शकते आणि त्यांच्या रोजगारातून साधल्या जाणारा विकास देशाच्या अर्थव्यवस्थेला सावरून धरण्यात, उभारी देण्यात मोलाची भूमिका बजाऊ शकते हे वास्तव मनरेगा योजनेतून निष्पन्न झाले. याचा अर्थ देशाच्या आर्थिक विकासाचे केंद्रबिंदू यांचे केंद्रीकरण होता कामा नये; हा नवा धडा कोविड काळाने शिकविला आहे. ग्रामीण विकास देशाच्या अर्थव्यवस्थेला पूरक ठरणार हे २०२०—२१ च्या काळातील होणाऱ्या मूल्यमापनातून सिद्ध होणारी बाब निश्चितच राहणार आहे. अवाढव्य स्थलांतरीत संख्येला सावरून धरत त्यांच्यात आत्मविश्वास आणि आत्मनिर्भरतेची भावना पेरण्यात मनरेगा योजना सर्वाधिक उपयुक्त ठरली असल्याचे एकूणच चित्र सदर संशोधन लेखनात उमटलेले आहे.

विकासातील संतुलन आणि शहरी व ग्रामीण भागातील दरी यांच्यातील विषमता मिटवून टाकण्याच्या दृष्टीने २००५ च्या काळात केंद्रसरकारच्या माध्यमातून ही योजना संपूर्ण भारताकरीता लागू करण्यात आली. २००६ मध्ये योजनेचा प्रारंभ झाला. नागपूर जिल्ह्यात १ एप्रिल २००८ पासून ही योजना नागपूर जिल्ह्यात अंमलात आणल्या गेली. योजनेचे मूलभूत तत्त्व विस्थापण, स्थलांतरण थांबविणे आणि मर्यादित परिघाच्या आतच काम मिळण्याची हमी

देणे, कुटुंबाची होणारे ससेहोलपट, पाल्यांच्या शिक्षणाचा प्रश्न या विवेचनेतून पूर्णतः मुक्त करणे हे त्यामध्ये अंतर्भूत होते. मनरेगा योजनेवर संमिश्र प्रतिक्रीयाही आल्या. शासन सत्तेमध्ये परिवर्तन झाले की लागू केलेल्या योजनांची समिक्षा करून ती सुरू ठेवायची अथवा नाही याचाही बरेचदा निर्णय घेतल्या जातो. मनरेगा योजना अनेक योजनांच्या तुलनेत मात्र प्रभावी आणि उपयुक्तकारक होती. तीची उपयुक्तता कोविड—१९ मुळे अधिक मोठ्या प्रमाणात विशेषतः उपयुक्तकारक म्हणून लक्षात आली. भारत सरकारने जाहीर केलेल्या २० लाख कोटी पॅकेजमध्ये महत्त्वाचा टप्पा या योजनेकरिता दिला आणि योजना सदर परिस्थितीत अधिक जोमदारपणे राबवावी असेही निर्देश दिलेत. याचा अर्थ मूळ योजनेत विस्थापन आणि स्थलांतरण यांची जी चर्चा करण्यात आली होती ती प्रत्यक्षात कोविड काळात केंद्र आणि राज्य सरकारांच्या लक्षातही आली आणि तिचे महत्त्व जाणवल्यामुळे योजनेच्या प्रतीचा असणारा दृष्टिकोण यात अधिक सक्षमता आली त्यामुळे मनरेगा योजना कोविडच्या काळातील एक प्रभावी उत्तर म्हणून सामोरे आलेले दिसून येते. थोडक्यात भारतातील स्थलांतरितांकरीता ही योजना ‘संजीवनी’ ठरली आहे.

**संदर्भ ग्रंथ सुची :**


१) Reddy K. Sateesh (1999), Poverty and Unemployment, A Theoratical Framework, Anmol Publications Pvt. Ltd., New Delhi, Pg. No. 63.

२) प्रा. मायी सुनिल (२००९), महाराष्ट्रातील गरिबी, डायमंड पब्लिकेशन, पुणे, पृ. क्र.२.

३) देसाई संदीप (२००४), भारतासमोर सध्या प्रश्न आहेत तरी कोणते? योजना, पृ. १७.

४) कविमंडन विजय (२००६), ग्रामीण विकासाचा एकात्मिक दृष्टिकोण, निती कार्यक्रम आणि व्युव्हरचना, मंगेश प्रकाशन, नागपूर, पृ.क्र. १.

५) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा ‘मनरेगा’ (२०११), जिल्हा समन्वयक तथा जिल्हाधिकारी, नागपूर, पृ. १.

६) गांगुर्डे किशोर (एप्रिल २००८), हमी रोजगाराची साथ केंद्राची, लोकराज्य, पृ. १९.

७) राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी मार्गदर्शक सुचना २००६, परिच्छेद ५.

८) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना मार्गदर्शक सुचना, २०१३ (चतुर्थ आवृत्ती) मधील महत्त्वाची प्रकरणे आणि सुधारित अनुसूची २ व ३, महाराष्ट्र शासन नियोजन (रोजगार हमी) विभाग, मुंबई, पृ. १४.

९) जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन—२०१९, जिल्हा नागपूर, जिल्हा सांख्यिकी कार्यालय, नागपूर, पृ. १.

१०) यादव रामजी (२००५), भारत मे ग्रामीण विकास, अर्जुन पब्लिकेशन हाऊस, नई दिल्ली, पृ. १५.

११) घोडके अमोल लक्ष्मण (२०१३), भारतातील मानव संसाधन विकास, युनिक ॲकॅडमी, पुणे, पृ. ३५७.

१२) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना महाराष्ट्र व राज्य रोजगार हमी योजना वार्षिक अहवाल सन २०१७—१८, महाराष्ट्र शासन नियोजन (रोजगार हमी योजना) विभाग, मुंबई, पृ. ४.

१३) डॉ. कुलकर्णी बी. वाय. (२०१३), भारतीय संविधान शासन व राजकीय प्रक्रिया, एज्युकेशनल पब्लिशर्स, औरंगाबाद, पृ. ९८.


**संकेतस्थळे :**


१) www.nrega.nic.in

२) www.niti.gov.in

३) www. Mahaegs.maharashtra.gov.in

४) http://indiabudget.nic.in